**दिनांक: २०.०२.२०२६**

नियमीत फौ. प्र. क्र.२४७/२०१३
सरकार ...वि... चंपालाल खत्री+ १
**निशाणी क्र.४८ वर**

**आरोपींतर्फे उलटतपास ॲड. श्री. ए. टी. विश्वकर्मा यांचे मार्फत–**

हे म्हणने खरे आहे की, रामलालजी खत्री ट्रस्ट निर्माण करण्याचा उद्देश कुटुंबातील लाभार्थींना ट्रस्टच्या मालमत्तेतुन आर्थीक मदत मिळण्याचा होता. हे म्हणने खरे आहे की, रामलालजी खत्री ट्रस्टच्या उत्पन्नाचे मुख्य स्त्रोत हे ट्रस्टच्या असलेल्या गोदाम व दुकानांच्या भाडयातुन मिळणाऱ्या रकमेचा होते. हे म्हणने खरे आहे की, रामलालजी खत्री ट्रस्ट निर्माण होण्यापुर्वीच ट्रस्टच्या सर्व गोदाम व दुकानांची निर्मीती व बांधकाम झालेले होते. रामलालजी खत्री ट्रस्टच्या गोदांमापैकी काही गोदाम व दुकाने आज मितीस सुस्थीतीत आहेत व काही दुकाने व गोदाम पडझड झालेले आहेत असे माझे म्हणने आहे. हे म्हणने खरे आहे की, रामलालजी खत्री ट्रस्ट निर्माण झाल्याच्या दिनांकास ट्रस्टची दुकाने व गोदाम भाडयाने दिलेले होते. हे म्हणने खरे आहे की, ट्रस्टच्या नोंदणीच्या दस्तऐवजाप्रमाणे ट्रस्टची कोणतीही मालमत्ता विक्री करता येणार नाही असे नमुद होते. हे म्हणने खरे आहे की, ट्रस्टच्या मालमत्तेपैकी दुकाने व गोदामे ही ट्रस्टच्या दस्तऐवजामध्ये नमुद असलेल्या लोकांनाच भाडयाने देण्यात आले होते. हे म्हणने खरे आहे की, रामलालजी यांच्या चार वारस नामे रतनलाल, चंपालाल, अंबालाल व मोतीलाल यांच्या वारसांपैकी चंपालाल यांचे वारस वगळता इतर वारसांच्या ताब्यात सुध्दा गोदामे व दुकाने भाडयाने आहेत. रामलालजी खत्री ट्रस्ट निर्माण झाली तेव्हा गोदामे व दुकाने खुप अल्प भाडयाच्या दरात भाडयाने देण्यात आली होती किंवा कसे हे मला माहीत नाही. हे म्हणने खरे आहे की, मी पोलीस स्टेशनमध्ये प्रस्तुत प्रकरणाची रिपोर्ट देण्यापुर्वी रामलालजी खत्री ट्रस्टच्या मालकीच्या दुकाने व गोदामे कोणत्या कोणत्या व्यक्तीला, कोणते कोणते दुकान किंवा गोदाम व नक्की किती किती रक्कम दरमहा भाडयाने दिल्या आहेत याची संपुर्ण माहीती घेतली होती. मी प्रस्तुत प्रकरणातील रिपोर्ट देण्याच्या तारखेपर्यंत ट्रस्टच्या मालकीच्या बऱ्याच गोदाम व दुकानांबाबत भाडे नियंत्रण अधिनियमातर्गत प्रकरणे दाखल व प्रलंबीत होती किंवा कसे हे

मला माहीत नाही. हे म्हणने खरे आहे की, रामलालजी खत्री ट्रस्टच्या ट्रस्टींपैकी एक ट्रस्टी हे माझे वडील मोतीलालजी हे सुध्दा होते. हे म्हणने खरे आहे की, माझे वडील मोतीलालजी हे त्यांच्या मृत्युपर्यंत ट्रस्टचे ट्रस्टी होते. माझे वडील मोतीलालजी खत्री हे सन २००४ मध्ये मरण पावले. हे म्हणने खरे आहे की, रामलालजी खत्री ट्रस्टचे दुसरे ट्रस्टी रतनलालजी व अंबालालजी हे सुध्दा त्यांच्या मृत्युपर्यंत ट्रस्टचे ट्रस्टी होते. अंबालालजी खत्री सन १९९७ मध्ये मरण पावले. रतनलालजी हे अंबालालजीच्या मृत्युच्या १० वर्षापुर्वी मरण पावले. हे म्हणने खरे आहे की, माझ्या लग्नाच्या वेळेस मला सुध्दा रामलालजी खत्री ट्रस्टच्या मालमत्तेपैकी र.रुपये ५०००/– मिळाले होते. हे म्हणने खरे आहे की, ट्रस्टच्या दस्तऐवजानुसार लाभार्थींना लग्नाकरीता मिळणाऱ्या प्रत्येकी रुपये ५०००/– रक्कम दिल्यानंतर उर्वरीत रक्कम ही ट्रस्टींच्या बहुमताने पुनमचंद खत्री अन्ड ब्रदर्स या भागीदारच्या दुकानामध्ये किंवा दुसऱ्या दुकानात किंवा बँकेत किंवा सरकामान्य सेक्युरीटीजमध्ये गुंतविण्याचे ठरले होते. रतनलालजी यांच्या मृत्युनंतर त्यांचे वारस ट्रस्टचे ट्रस्टी झाले. तसेच अंबालालजी यांच्या मृत्युनंतर त्यांचे वारस सुध्दा ट्रस्टचे ट्रस्टी झाले. मोतीलालजी यांच्या मृत्युनंतर त्यांचे वारस ट्रस्टचे ट्रस्टी झाले नाही. हे म्हणने खरे आहे की, रतनलालजी व अंबालालजी यांचे वारस सन २०१२ पर्यंत ट्रस्टचे ट्रस्टी होते. मी प्रस्तुत प्रकरणातील रिपोर्ट देण्याच्या तारखेला रतनलालजी यांचे वारस शांतीलालजी, हिरालालजी, मोहनलालजी व छगनलालजी हे हयात होते. मी प्रस्तुत प्रकरणातील रिपोर्ट देण्याच्या तारखेला अंबालालजी यांचे वारस सुरेंद्रलालजी हे हयात होते. मी प्रस्तुत प्रकरणातील रिपोर्ट देण्याच्या तारखेला मोतीलालजी यांचे वारसांपैकी मी व माझा मोठा भाऊ रवि हे हयात होतो व आहे.

(न्यायालयाची वेळ संपल्यामुळे साक्षीदाराचा उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकुब)

समक्ष

**( पी.के.नरडेले )**
मुख्य न्यायदंडाधिकारी,
अमरावती.